SAMPLE CONTENT

# मराठी (LL)

# व्याकरण व लेखन



सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

अमृत पुलेकर
M.A., B.Ed.

Std. VI
(ENG. MED.)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (LL)
# व्याकरण व लेखन
## इयत्ता सहावी

Sample Content

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित कृती समाविष्ट
- व्याकरण विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- व्याकरण विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरिता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरिता उत्तरसूची समाविष्ट
- लेखन विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- लेखन विभागातील घटकांमध्ये सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Printed at: **India Printing Works,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 | TEID: 2400 | P.O. No. 4760

# प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील प्रत्येक टप्पा महत्त्वाचा असतो. इयत्ता सहावीचे वर्षही विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी **टार्गेट प्रकाशनाचे मराठी (LL) व्याकरण व लेखन इयत्ता सहावी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरणात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सराव कृती समाविष्ट केल्या आहेत. शब्दसंपत्ती व व्याकरणावरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

लेखन विभागात नवनिर्मितीचा आनंद दडलेला असतो. विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. लेखन विभागामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना कृतींनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरणावर आधारित भरपूर कृती, लेखन विभागातील २१ निबंध, ६ पत्रे, १२ कथा, ५ गद्य आकलन, सूचनाफलक, घोषवाक्ये, संदेशलेखन, अनुलेखन एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी सुलभभारती; पाचवे पुनर्मुद्रण: २०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **व्याकरण विभाग** | |
| १. | शब्दांच्या जाती | |
| • | नाम | १ |
| • | सर्वनाम | ३ |
| • | विशेषण | ६ |
| • | क्रियापद | ९ |
| • | क्रियाविशेषण अव्यय | १० |
| • | शब्दयोगी अव्यय | १२ |
| • | उभयान्वयी अव्यय | १३ |
| • | केवलप्रयोगी अव्यय | १५ |
| २. | काळ | १६ |
| ३. | उपसर्ग आणि प्रत्यय | १८ |
| ४. | समानार्थी शब्द | २२ |
| ५. | विरुद्धार्थी शब्द | २५ |
| ६. | लिंग | २८ |
| ७. | वचन | ३१ |
| ८. | वाक्प्रचार | ३५ |
| ९. | विरामचिन्हे | ४१ |
| १०. | लेखननियम | ४५ |
| ११. | म्हणी | ४७ |
| १२. | शब्दसंपत्ती | ५० |
| • | सराव कृतिपत्रिका – १ | ६० |
| • | सराव कृतिपत्रिका - २ | ६१ |
| • | उत्तरे | ६३ |
| | **लेखन विभाग** | |
| १. | निबंधलेखन | ७४ |
| २. | पत्रलेखन | ८२ |
| ३. | गद्य आकलन | ८६ |
| ४. | कथालेखन | ८८ |
| ५. | सूचनाफलक | ९५ |
| ६. | घोषवाक्ये | ९७ |
| ७. | संदेशलेखन | ९९ |
| ८. | अनुलेखन | १०० |


**[टीप: पाठाखाली दिलेले व्याकरण, लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

Sample Content

# व्याकरण विभाग

## १ शब्दांच्या जाती

आपण भाषा बोलतो त्यामध्ये अनेक शब्द असतात. अक्षरांचा अर्थपूर्ण समूह म्हणजे शब्द असे म्हटले जाते. या शब्दांपासून वाक्ये बनतात. या वाक्यांच्या मदतीने आपण आपल्या मनातील भावना, विचार व्यक्त करतो. आपण मराठी भाषेत बोलताना किंवा लिहिताना जे शब्द वापरतो त्यांना आठ प्रकारांत विभागले आहे. यालाच 'शब्दांच्या जाती' असे म्हणतात. शब्दांच्या जातीचे दोन मुख्य प्रकार आहेत - 'विकारी (सव्यय) शब्द व अविकारी (अव्यय) शब्द'.

**शब्दांच्या जाती (Part of Speech)**

| विकारी शब्द | अविकारी शब्द |
|---|---|
| १. नाम (Noun) | ५. क्रियाविशेषण अव्यय (Adverb) |
| २. सर्वनाम (Pronoun) | ६. शब्दयोगी अव्यय (Preposition) |
| ३. विशेषण (Adjective) | ७. उभयान्वयी अव्यय (Conjunction) |
| ४. क्रियापद (verb) | ८. केवलप्रयोगी अव्यय (Interjection) |

विकारी शब्द म्हणजे ज्या शब्दांमध्ये लिंग, वचन, विभक्ती यांनुसार बदल होतात, तर अविकारी शब्द म्हणजे ज्या शब्दांमध्ये कोणताही बदल होत नाही.

इयत्ता सहावीमध्ये आपण नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय यांचा अभ्यास करणार आहोत.

### नाम (Noun)

**कोणत्याही खऱ्या अथवा काल्पनिक व्यक्तीचे, वस्तूचे, प्राण्याचे, पक्ष्याचे, एखाद्या जागेचे, पदार्थाचे किंवा भावभावनांचे नाव म्हणजे 'नाम' होय. सृष्टीतील सजीव, निर्जीव अथवा काल्पनिक घटकाचे नाव, तसेच भावभावनांना दिलेले नाव म्हणजेच 'नाम' होय.**

**उदा.** भारत, रंग, माती, पाणी, हिमालय, आनंद, प्रेम इत्यादी.

**नामाचे प्रकार:**

१. सामान्यनाम (Common Noun) २. विशेषनाम (Proper Noun) ३. भाववाचकनाम (Abstract Noun)

१. **सामान्यनाम (Common Noun):**

एकाच जातीच्या किंवा एकाच गटातील पदार्थांच्या समान गुणधर्मामुळे त्यांना जे एकच नाव दिले जाते त्याला 'सामान्यनाम' असे म्हणतात. **उदा.** मुलगी, ग्रह, प्राणी.

**टीप:** मराठीमध्ये 'समुदायवाचक नामे' आणि 'द्रव्यवाचक नामे' यांना 'सामान्य नामे' समजले जाते.

**उदा.** मोळी, थवा, तांबे, पाणी, सोने.

२. **विशेषनाम (Proper Noun):**

कोणत्याही एका व्यक्ती, प्राणी, वस्तू किंवा जागेला आपण ज्या विशिष्ट नावाने संबोधतो त्याला 'विशेषनाम' म्हणतात.

**उदा.** रिमा, भारत, हिमालय, सरिता, सूर्य, चंद्र.

Sample Content

**३. भाववाचकनाम (Abstract Noun):**

जे डोळ्यांनी पाहता येत नाही, ज्याला आपण स्पर्श करू शकत नाही अशा भावना, गुण, अवस्था किंवा कृती यांना जे नाव दिलेले असते त्याला 'भाववाचक नाम' असे म्हणतात.

**उदा.** सौंदर्य, नम्रता, श्रीमंती, मनुष्यत्व, गरिबी.

| सामान्यनामे | विशेषनामे | भाववाचकनामे |
|---|---|---|
| कुत्रा, देश, नदी, शहर, साखर, सैन्य, पोपट, पर्वत, झाड. | रघू, मुंबई, गंगा, भारत, राम, हिमालय, रायगड, लता, श्रीलंका, रावण. | शौर्य, गोडी, एकता, माणुसकी, दादागिरी, गारवा, चपळाई, महागाई, थोरवी. |

**लक्षात ठेवा**

- सामान्य नामांचे अनेकवचन होते.

## सराव कृती

***कृ.१. खालील वाक्यांतील नामांना अधोरेखित करा.**

i. बाबांचा सदरा उसवला.
ii. सुमनने गुलाबाचे रोपटे लावले.
iii. पाकिटात पैसे नव्हते.
iv. मुले बागेत खेळत होती.
v. समोरून बैल येत होता.
vi. सरिता व फरिदा चांगल्या मैत्रिणी आहेत.
vii. पंकजने परीक्षेत पहिला नंबर मिळवला.

**कृ.२. रिकाम्या जागी योग्य नामे लिहून वाक्य पूर्ण करा.**

(मन, चिकाटी, घरटे, आगगाडी, दिवस, विद्यार्थी)

i. ------------------ झुकझुक करत चालली होती.
ii. ------------------ आनंदाने थुईथुई नाचत होते.
iii. सुगरण पक्षी ------------------ बांधत होता.
iv. जॉनला त्याची ------------------ भावून जायची.
v. एक ------------------ पुस्तक वाचत आहे.
vi. पावसाळ्याचे ------------------ होते.

**कृ.३. खालील शब्दांतील नामे ओळखून लिहा.**

सुंदर, आंबा, ताजे, डोंगर, सात, दूध, नदी, ससा, काळा, उंच, हत्ती, वस्तू, जिव्हाळा, कहाणी, घर, राष्ट्र, तारा, उशिरा, किल्ला, गुण.

**उत्तर:** ----------------------------------------------------------------

**कृ.४. खालीलपैकी योग्य पर्यायाला ✓ करा.**

i. सामान्यनाम ओळखा.
(अ) प्रेम ☐ (ब) माणुसकी ☐ (क) संत ☐ (ड) शांती ☐

ii. सामान्यनाम असलेला शब्द ओळखा.
(अ) आनंद ☐ (ब) गरीब ☐ (क) नदी ☐ (ड) शरद ☐

Sample Content

Page no. **3** to **59** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# सराव कृतिपत्रिका – १

## व्याकरणावर आधारित

**वेळ: १ तास** **एकूण गुण – १५**

**कृ.१. खालील शब्दांची जात ओळखा व त्याचा प्रकार लिहा.** **(२ गुण)**

i. सुंदर – ----------------------- ii. अनिकेत – -----------------------

**कृ.२. खालील वाक्यांचे काळ ओळखा.** **(२ गुण)**

i. सचिन सुंदर स्वप्न पाहत होता. – -----------------------------------------------------

ii. विश्वास लवकरच गावी जाईल. – -----------------------------------------------------

**कृ.३. खालील प्रत्यय असलेले दोन शब्द लिहा.** **(१ गुण)**

[ --------------- ] ← **कार** → [ --------------- ]

**कृ.४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(१ गुण)**

i. वन – ----------------------- ii. रजनी – -----------------------

**कृ.५. खालील अधोरेखित शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.** **(१ गुण)**

काल वर्गातील मुले <u>बेशिस्तपणे</u> वागली.

उत्तर: ------------------------------------------------------------------------------------------

**कृ.६. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१ गुण)**

i. उंट – ----------------------- ii. मांजर – -----------------------

**कृ.७. खालील शब्दांचे वचन बदला.** **(१ गुण)**

i. भिंती – ----------------------- ii. तारा – -----------------------

**कृ.८. खालील विरामचिन्हांची नावे ओळखा.** **(१ गुण)**

i. [ . ] – ----------------------- ii. [ ‘ ’ ] – -----------------------

**कृ.९. खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** **(२ गुण)**

शाबूत राहणे – ------------------------------------------------------------------------------

**वाक्य:** ------------------------------------------------------------------------------------

**कृ.१०.खालीलपैकी शुद्ध शब्द ओळखा.** **(२ गुण)**

i. जिंनस / जिन्नस / जीन्नस / जींनस – -----------------------

ii. परंतू / पंरतू / परंतु / परतूं – -----------------------

**कृ.११.खालील म्हण पूर्ण करा.** **(१ गुण)**

खाई त्याला ----------------------- .

Sample Content

Page no. **61** to **62** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# उत्तरे

## १. शब्दांच्या जाती

### • नाम

१. i. बाबांचा सदरा उसवला.
ii. सुमनने गुलाबाचे रोपटे लावले.
iii. पाकिटात पैसे नव्हते.
iv. मुले बागेत खेळत होती.
v. समोरून बैल येत होता.
vi. सरिता व फरिदा चांगल्या मैत्रिणी आहेत.
vii. पंकजने परीक्षेत पहिला नंबर मिळवला.

२. i. **आगगाडी** झुकझुक करत चालली होती.
ii. **मन** आनंदाने थुईथुई नाचत होते.
iii. सुगरण पक्षी **घरटे** बांधत होता.
iv. जॉनला त्याची **चिकाटी** भावून जायची.
v. एक **विद्यार्थी** पुस्तक वाचत आहे.
vi. पावसाळ्याचे **दिवस** होते.

३. आंबा, डोंगर, दूध, नदी, ससा, हत्ती, वस्तू, जिव्हाळा, कहाणी, घर, राष्ट्र, तारा, किल्ला, गुण.

४. i. (क) संत ii. (क) नदी
iii. (अ) परराष्ट्र iv. (क) सिंगापूर
v. (क) ग्रह

५. i. संघ ii. वन iii. आनंद iv. रमेश

६.

| क्र. | सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|---|
| i. | - | अप्पाजी | - |
| ii. | राजा, कोबी | - | - |
| iii. | आई | - | माया |
| iv. | मासे, मासळी, समूह | मिनू | - |

### • सर्वनाम

१. i. मी कुमारला हाक मारली.
ii. तुला नवीन दप्तर आणले.
iii. त्याने घर झाडून घेतले.
iv. मी त्यांना सुविचार सांगितला.
v. त्याचा फोटो छान येतो.
vi. आपण पतंग उडवूया.

२. सलीम नुकताच शाळेत दाखल झाला होता. त्याला शाळेत करमत नव्हते. तो त्याच्या आईबरोबर शाळेत यायचा. तेवढ्यात त्याला त्याची मैत्रीण दिसली. सलीम त्याच्या आईला म्हणाला, "तू जा. मी आज तिच्याबरोबर घरी येईन."

३. i. हसिना खेळाडू आहे. **ती** रोज पटांगणावर खेळते.
ii. बाईंनी मुलांना खाऊ वाटला. **त्यांनी** मुलांशी गप्पा मारल्या.
iii. घरातील सगळे म्हणाले, '**आपण** सिनेमाला जाऊ.'
iv. जॉनने **स्वत:** चहा केला.

४. i. **तुम्ही** गावाला जा.
ii. आईने **तिचा** डबा भरून दिला.
iii. आज **आम्ही** खूप मजा केली.
iv. दादा धावपटू आहे. **तो** रोज पळतो.
v. **तिने** बाळाला मांडीवर घेतले.
vi. मोत्याने धावत येऊन **आमचे** स्वागत केले.

५. i. आम्ही ii. ती
iii. माझे, माझ्या iv. आम्ही

६.

| क्र. | पुरुषवाचक सर्वनाम | दर्शक सर्वनाम | संबंधी सर्वनाम | प्रश्नार्थक सर्वनाम |
|---|---|---|---|---|
| i. | – | हे | – | – |
| ii. | त्यांना | हे | – | कोण |
| iii. | त्याला | – | – | – |
| iv. | मी | – | – | – |
| v. | – | ही | – | – |
| vi. | – | ती | जी जी | – |

### • विशेषण

१. i. अ. उंच , टोलेजंग
ब. मजबूत
ii. अ. गुबगुबीत
ब. पांढराशुभ्र
iii. अ. लालेलाल
ब. रसाळ
iv. अ. ताकदवान
ब. अगडबंब
v. अ. हिरवेगार
ब. उंच
vi. अ. सुरेख
ब. रंगीबेरंगी
vii. अ. सुंदर
ब. आकर्षक
viii. अ. टुमदार
ब. मजबूत

२. i. हिमालय **उंच** पर्वत आहे.
ii. कंपास घ्यायला आईने मला **शंभर** रुपये दिले.
iii. बागेत **टवटवीत** फुले आहेत.
iv. ताईने मला **नवा** सदरा दिला.

३. (i – ब) (ii – क) (iii – ड) (iv – अ)

Sample Content

४. i. अ. **हिरवीगार** कोबी ब. **ताजी** कोबी
क. **चविष्ट** कोबी ड. **चांगली** कोबी

ii. अ. **टिकाऊ** मूर्ती ब. **निकृष्ट** मूर्ती
क. **उत्कृष्ट** मूर्ती ड. **तिसरी** मूर्ती

iii. अ. **लखलखीत** ऊन ब. **रखरखते** ऊन
क. **कडक** ऊन ड. **रणरणते** ऊन
इ. **तप्त** ऊन फ. **कोवळे** ऊन
ग. **सोनेरी** ऊन

iv. अ. **लाल** गुलाब ब. **ताजा** गुलाब
क. **टवटवीत** गुलाब ड. **टपोरा** गुलाब
इ. **सुंदर** गुलाब फ. **सुवासिक** गुलाब
ग. **नाजूक** गुलाब ह. **एक** गुलाब

v. अ. **गोड** आंबा ब. **आंबट** आंबा
क. **पिवळा** आंबा ड. **कच्चा** आंबा
इ. **रसाळ** आंबा फ. **एक** आंबा

५. i. वार्षिक ii. नवनव्या
iii. कुशाग्र, दृढ iv. नीटनेटके, मजबूत
v. विस्तृत vi. प्रसन्न

६.

| क्र. | गुणविशेषण | संख्याविशेषण | सार्वनामिक विशेषण |
|---|---|---|---|
| i. | खूप | – | – |
| ii. | – | बराच | तुमच्या |
| iii. | – | तिसऱ्या | हाच |
| iv. | जलद | – | – |

७. i. नीटनेटकी ii. चिकाटी
iii. जबाबदार iv. कष्टाळू

- **क्रियापद**

१. i. संपली ii. घेतले iii. बिलगलो
iv. भिजले v. आहे vi. शिकतो
vii. सांगा viii. पसरली

२. i. वरद कबड्डी **खेळतो**.
ii. झाडावरून आंबा **पडला**.
iii. आई काम **करते**.
iv. राम हुशार **आहे**.
v. रमेश पुस्तक **देईल**.
vi. विजय अभ्यास **करतो**.

३. i. सुचली ii. जमवले iii. मिळाले
iv. वाटले v. करते

४. ठेवला, आहे, मिळाली, यायचे, बसतो, व्हावे, परतावे, खेळावे, पहावे.

- **क्रियाविशेषण अव्यय**

१. i. भुरभुर ii. खुदकन iii. खुळखुळ
iv. मंद मंद v. थुईथुई vi. रोज

२. i. आबा **दररोज** वर्तमानपत्र वाचतात.
ii. महेश **वारंवार** आजारी पडतो.
iii. राहुल **सध्या** विदेशात आहे.
iv. मयूर **नेहमी** पहिला येतो.
v. ईश्वर **सर्वत्र** आहे.
vi. घराच्या **सभोवार** फुले फुलली होती.

३. जेथे, लांब, परवा, सतत, पूर्वी, पटकन, टपटप, थोडा.

४. i. वळून बघत कासवदादा **हळूहळू** निघाले.
ii. गाडीवान **रोज** कोबींच्या रोपांना पाणी देत होता.
iii. आप्पाजींनी **झटकन** उत्तर दिले.
iv. मुले **दिवसभर** खेळत होती.
v. सरू खरेदीला **मुळीच** येणार नाही.
vi. भरत **किंचित** हसला.

५. i. टपटप ii. पटपट iii. हळू
iv. खाली v. दररोज vi. तिकडे
vii. वारंवार viii. भरपूर ix. हल्ली
x. सदा xi. लांब xii. बहुत
xiii. तिकडून xiv. पलीकडे xv. परवा
xvi. सतत xvii. पूर्वी xviii. जरा
xix. रात्रीस xx. आपोआप

- **शब्दयोगी अव्यय**

१. i. खिडकीतून ⟶ आतून, उन्हामुळे ⟶ मुळे
ii. मांडीवर ⟶ वर, माझ्याकडे ⟶ कडे
iii. शेतातील ⟶ आतील, वाऱ्यावर ⟶ वर
iv. पदवीपर्यंत ⟶ पर्यंत, झाल्यानंतर ⟶ नंतर, शिक्षणासाठी ⟶ साठी
v. मोटारीकरिता ⟶ करिता
vi. आपल्याविषयी ⟶ विषयी, गृहस्थांबद्दल ⟶ बद्दल

२. i. मुलां**पेक्षा** ii. कुटुंबा**विषयी**
iii. डोक्या**वरून** iv. पावसा**मुळे**
v. प्रवाहा**बरोबर** vi. काठा**कडे**

३. i. आजी**शिवाय** घराला घरपण नाही.
ii. राम**पेक्षा** शाम वेगाने धावतो.

Sample Content

Page no. **65** to **73** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# लेखन विभाग

## १ निबंधलेखन

**'विषयाला अनुसरून आपले विचार व भावना यांची साचेबद्ध गुंफण करणे' निबंधलेखनात अपेक्षित असते. निबंधलेखन हा सृजनाचा आविष्कार असतो. 'निबंध' म्हणजे विचार, भावना आणि कल्पनांचे सुसंगत लेखन होय.** यात विषय ठरावीक मर्यादेत प्रभावीपणे मांडावा लागतो. चांगल्या निबंधात उत्तम विचार, भावना, अनुभव, घटना, व्यक्तीविशेष, कल्पना इत्यादींचे माहितीपूर्ण विवेचन केले जाते. उत्तम निबंधलेखन करणे ही एक कला आहे. ती सातत्यपूर्ण सरावाने प्राप्त करता येते.

निबंधांचे वर्णनात्मक निबंध, व्यक्तिचित्रणात्मक निबंध, आत्मवृत्तात्मक निबंध, कल्पनाप्रधान निबंध, वैचारिक निबंध इत्यादी प्रकार पडतात. यावर्षी आपण प्रसंगलेखन, कल्पनाप्रधान निबंध, व्यक्तिचित्रणात्मक निबंध, वर्णनात्मक निबंध (चित्रवर्णनात्मक) आणि वैचारिक निबंध यांचा अभ्यास करणार आहोत.

**लक्षात ठेवा**

- निबंध विषयाला धरून साचेबद्ध रितीने मांडावा.
- आपले विचार, भावना, कल्पना यांचे चित्रण निबंधातून घडावे.
- निबंध सुटसुटीत, चांगल्या हस्ताक्षरात लिहावा.
- निबंधाचा प्रकार लक्षात घेऊन त्यानुसार रचना करावी.
- प्रसंगलेखन अथवा अनुभवलेखन करताना आपण तेथे उपस्थित होतो असे वर्णन करावे.
- कल्पनाप्रधान निबंध लिहिताना अशक्य गोष्टी शक्य झाल्यास काय होऊ शकेल याचा साधक बाधक विचार निबंधात मांडावा.
- व्यक्तिचित्रणात्मक निबंध लिहिताना त्या व्यक्तिविषयीची वास्तव माहिती लिहिणे अपेक्षित असते.
- वैचारिक निबंध लिहिताना विषयानुरूप आपल्याला जाणवणाऱ्या सकारात्मक, नकारात्मक बाजू मांडून अंतिम निकष मांडावा.
- निबंध लिहिताना शुद्धलेखनाकडे लक्ष द्यावे. खाडाखोड करणे टाळावे.
- चित्रवर्णन करताना चित्रातील विविध घटकांचा सहसंबंध लक्षात घेऊन लेखन करणे अपेक्षित असते.
- निबंध मुद्देसूद, सोपा, छोट्या वाक्यांत लिहिलेला, सुविचार, म्हणी, इत्यादींचा समावेश असलेला व परिच्छेदामध्ये विभागलेला असावा.

**नमुना कृती**

**कृ.१. खालील विषयांवर निबंध लिहा.**

१. **मी केलेले चांगले काम**

उत्तर:

**मी केलेले चांगले काम**

मी शाळेतून घरी निघालो होतो. वाटेत रस्त्याच्या कडेला एक कुत्र्याचे पिल्लू जोरजोराने ओरडत होते. मी जवळ जाऊन पाहिले, तर त्याच्या पायाला लागले होते. मला अगोदर भीती वाटली, की त्या पिल्लाची आई जवळपास असेल, तर माझ्या अंगावर धावून येईल. मी इकडे तिकडे पाहिले. त्या पिल्लाच्या डोक्यावरून हात फिरवला. तसे त्या पिल्लाला बरे वाटले. त्याचे ओरडणे कमी झाले.

मी थोडा विचार केला. पिल्लाला घरी नेले, तर आई ओरडेल हे मला माहीत होते; पण पिल्लाच्या पायाला जखम झालेली पाहून त्याला औषध मिळावे असे वाटत होते. शेवटी मनाचा निर्धार करून मी पिल्लाला उचलले आणि घरी घेऊन गेलो. घरात जाण्याअगोदरच आईने विचारले, "अरे कुत्र्याचे पिल्लू कशाला आणलेस?" आईला त्याच्या पायाची जखम दाखवताच तिने पहिल्यांदा त्याला अंघोळ घालायला सांगितली. मी पिल्लाला अंघोळ घातली. नंतर स्वत: अंघोळ केली. आईने पिल्लाला कोरड्या

Sample Content

फडक्याने पुसले. त्याच्या पायाला मलमपट्टी केली. आईने त्याला वाटीत दूध आणून दिले. त्याने ते पटपट पिऊन टाकले. त्यानंतर त्याला हुशारी आली. आईने शाबासकी देत म्हटले, "तू खूप चांगलं काम केलेस" आणि त्याचे बक्षीस म्हणून हे पिल्लू आपल्याच घरात राहील असे आश्वासन तिने दिले.

**२. सुट्टीची मजा**

**उत्तर:**

**सुट्टीची मजा**

आम्ही सगळी भावंडे सुट्टीमध्ये आमच्या मामाच्या गावी जातो. गावाला आजी-आजोबा आम्हां सर्वांचे खूप लाड करतात. सकाळी उशिरा उठणे, समुद्रावर पोहायला जाणे, आल्यानंतर न्याहारी, दुपारचे जेवण, फेरफटका, गप्पागोष्टी आणि रात्रीचे जेवण हा रोजचा दिनक्रम असतो. मधल्या वेळेत आजोबांच्या गोष्टी ऐकण्यात जी मजा येते ती कशातही नाही.

संध्याकाळच्या वेळेत क्रिकेट खेळण्यासाठी आम्ही बच्चे कंपनी मामाला सोबतीला घेऊन समुद्रावर जातो. वाळूवर क्रिकेट खेळताना बिनधास्त लोळणे, धावणे, पडणे, आरडाओरडा यात वेळ निघून जातो. घरी आल्यानंतर विहिरीवर थंड पाण्याने आंघोळ, त्यानंतर रात्रीचे जेवण. आजी आणि मामीच्या हातचे जेवण म्हणजे दोन घास जास्तच जातात. रात्री झोपण्यापूर्वी बैठे खेळ खेळताना एकमेकांना मदत करून दुसऱ्यांना हरवण्यात धमाल येते. कधी शेतातून, कधी जंगलातून आंबे, काजू, करवंद, फणस आणून खाण्यातली मजा केवळ सुट्टीत अनुभवता येते. वर्षभर शहरातील वेगवान ओघात पळताना जगणे विसरलेलो आम्ही या सुट्टीत जीवनाची मजा अनुभवतो.

**३. अचानक आलेला पाऊस**

**उत्तर:**

**अचानक आलेला पाऊस**

दिवाळीची सुट्टी पडली आणि आम्ही किल्ला बनवण्याच्या तयारीला लागलो. दुपारची वेळ होती. घराबाहेर आईने चिवड्यासाठी पोहे, खोबरे, शेंगदाणे वाळत ठेवले होते. आम्ही सारे मित्र दगड, माती, विटा गोळा करत होतो. एकजण पुठ्ठा कापत होता. ताईने अंगणात सुंदरशी रांगोळी काढली होती. सारे काही शांत होते आणि अचानक आभाळ भरून आले. जोरदार वारा वाहू लागला. ढगांचा गडगडाट ऐकू आला. आई घराबाहेर धावतच आली. बाहेर वाळत घातलेले पदार्थ उचलण्याची एकच गडबड उडाली. आम्ही आईला मदत करायला धावलो. थेंब थेंब पडणाऱ्या पावसाने बघता बघता जोरदार बरसायला सुरुवात केली.

एकच गडबड गोंधळ उडाला. आम्ही सारे आडोशाला पळालो. पावसाने जोर पकडला. आम्ही किल्ल्यासाठी जमवलेली माती पावसाच्या पाण्यात वाहून गेली. पुठ्ठे पाण्यात भिजल्यामुळे त्यांचा लगदा झाला होता. आमचा सारा उत्साह या पावसात वाहून गेला होता. ताईची रांगोळी, तर पाण्याने धुवूनच निघाली होती. यामुळे, ती खट्टू होऊन बसली होती. अचानक आलेल्या पावसाने दिवाळीची तयारी करणाऱ्या साऱ्यांच्या आनंदावर विरजण घातले होते.

**४. दिवाळी**

**उत्तर:**

**दिवाळी**

दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. यावेळी घरोघरी दिवे लावले जातात. घराबाहेर आकाशकंदील टांगला जातो. दिव्यांची रोशणाई केली जाते. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चर्तुदशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज हे दिवस उत्साहाने साजरे होतात. वसुबारशीच्या दिवशी गाई-वासराचे पूजन केले जाते. धनत्रयोदशीला घरातील धनधान्याचे, सुबत्तेचे पूजन होते. नरक चर्तुदशीला अभ्यंगस्नान केले जाते, तर लक्ष्मीपूजनाला घरातील संपत्तीचे पूजन होते. पाडव्याच्या दिवशी पत्नी पतीला ओवाळणी करते. भाऊबीज हा दिवाळीच्या सणाचा शेवटचा दिवस असतो. भाऊ बहिणीकडे जातो. बहीण त्याला ओवाळते. भाऊ बहिणीला ओवाळणी देतो.

घराघरांतून लाडू, चिवडा, करंजी, चकली, शंकरपाळे, अनारसे असा फराळ बनवला जातो. काही लोक घराला रंगरंगोटी करतात. घराबाहेर रांगोळी काढली जाते. नवीन कपडे, भेटवस्तू, मिठाई यांची देवाणघेवाण दिवाळीच्या सणाला केली जाते. मुले, मोठी माणसे फटाके वाजवतात. सर्वांना एकत्र आणणारा, आनंदाची उधळण करणारा दिवाळीचा सण मला खूप खूप आवडतो.

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VI
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**ADDITIONAL TITLES**

GRAMMAR & WRITING SKILLS BOOKS (STD. VI & VII)
- Marathi
- Hindi

## AVAILABLE BOOKS FOR STD. VII
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery




Explore our range of STATIONERY

**Target Publications® Pvt. Ltd.**

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

Visit Our Website